| | | |
|---|---|---|
| | **पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड**<br>**पत्ता : प्रेमलोक पार्क,पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,**<br>**पुणे ४११०३३**<br>**फोननं. ०२०/२७३५०५५५** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
| प्रेसनोटता. २६/०६/२०२४ | | |

# २६ जुन रोजी जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिना निमीत्ताने पिंपरी चिंचवड अंमली पदार्थ विरोधी पथकाने विशेष जनजागृती कार्यक्रम घेतला.

---

आज २६ जुन रोजी जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिन असुन सदर अंमली पदार्थ विरोधी दिनाचे निमीत्ताने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे वतीने पिंपरी चिंचवड शहरात अंमली पदार्थ विरोधी पथक , अजमेरा कॉलणी, पिंपरी पुणे येथे मार्गदर्शक व्याख्याते यांचे व्याख्याने आयोजीत केलेली होती. सदरचा कार्यक्रम सकाळी १०/०० ते दुपारी १३/०० वा. चे दरम्यान पार पाडला. सदर कार्याक्रमामध्ये व्याख्याते श्री. विल्यम साळवी, विल्यम फाऊंडेशन यांनी व्यसनाचे दुष्परिणाम बाबत मार्गदर्शन केले. डॉ. राजीव नगरकर, मानसोपचार तज्ञ यांनी मनाची व्यायामशाळा या विषयावर मार्गदर्शन केले. त्याच प्रमाणे डॉ. श्री. विष्णु श्रीमंगले, कार्यकारी संचालक, मनोदय व्यसनमुक्ती संस्था यांनी वाढती व्यसनाधिनता व त्याचे युवकांवर होत असलेले दुष्परीणाम या विषयावर मार्गदर्शन केले. श्री. संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पिंपरीचिंचवड यांनी व्यसनाचे दुष्परीणाम या विषयावर मार्गर्शन केले. त्याच प्रमाणे श्री. सचिन कदम, सहायक पोलीस निरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथक, पिंपरी चिंचवड यांनी व्यसनाचे दुष्परीणाम, कायदयातील तरतुदी या विषयावर मार्गदर्शन केले आहे. सदर कार्यक्रमाला पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीतील स्थानिक झोपडपट्टीतील युवक, विदयार्थी व पालक असे एकुण १०० ते १५० जनसमुदाय उपस्थीत होता.

सदरचा कार्यक्रम मा. पोलीस आयुक्त, श्री. सुनिल रामानंद, अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त यांचे मार्गदर्शना खाली श्री. संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पिंपरी चिंचवड, श्री. विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड, श्री. वैभव शिंगारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंमली पदार्थ विरोधी पथक, श्री. सचिन कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्री. विक्रम गायकवाड, सहायक पोलीस निरीक्षक, श्री. ज्ञानेश्वर दळवी, पोलीस उप निरीक्षक यांनी व अंमली पदार्थ विरोधी पथकातील अंमलदार यांनी पार पाडला सदर कार्यक्रमाचे सुत्र संचलन पोलीस अंमलदार कपीलेश इगवे यांनी केलेले असुन श्री. वैभव शिंगारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी आभार प्रदर्शन केले.

**(संदीप डोईफोडे)**
**पोलीस उप आयुक्त**
**गुन्हे ,पिंपरीचिंचवड**